॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

अहिल्यानगर | मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ९३ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

*** सुविचार ***

यश त्यांचं असतं, जे प्रयत्न कधीच थांबवत नाहीत.

# अहिल्यानगर जिल्हा बँकेसाठी ३६९ उमेदवारी अर्ज दाखल

## तब्बल ९०३ अर्जाची विक्री । नेवासामधून एकमेव शंकरराव गडाख यांचा अर्ज तर शेवगावमधून घुले पती-पत्नींचे अर्ज

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखलच्या अखेरच्या दिवसापर्यंत तब्बल ९०३ अर्जाची विक्री झाली तर ३६९ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी मंगेश सुरवसे यांनी दिली.

उमेदवारी दाखल करण्याचा आज अखेरचा दिवस असल्याने अर्ज खरेदी व दाखल करण्यासाठी सकाळपासूनच इच्छुकांनी गर्दी केली होती. दुपारी तीन पर्यंत जे इच्छुक उपस्थित होते त्यांना आत घेत गेट बंद करुन त्यांचे अर्ज दाखल करुन घेतली. ही प्रक्रिया सुमारे अर्धातास सुरु होती.



उमेदवारी अर्ज दाखल केलेल्यांची नावे पुढील प्रमाणे : सोसायटी मतदारसंघ – **अकोले** : किरण लहामटे, शरद चौधरी, संजीवनी शिंदे, सिताराम गायकर, बाळासाहेब भोर, रावसाहेब वाकचौरे, कैलास वाकचौरे, वैभव पिचड, विकासराव शेटे, मधुकर नवले, चंदर बांडे. **जामखेड** : सचिन घुमरे, अमोल राळेभात, सुधीर राळेभात. **कर्जत** : तुषार पिसाळ, अंबादास पिसाळ, देविदास देशमुख, मंगेश जगताप, मंजुषा गुंड, ज्योती शिंदे, तुषार पिसाळ, सुरेश साळुंखे, किरण पाटील, काकासाहेब तापकिर, कैलास शेवाळे. **कोपरगाव** : संजय शिंदे, अनिल कदम बिपिनदादा कोल्हे, विवेक कोल्हे. **अहिल्यानगर** : बाळासाहेब हराळ, प्रताप शेळके, अक्षय कर्डिले. **नेवासा** : शंकरराव गडाख. **पारनेर** : गीतांजली शेळके, काशिनाथ दाते, निलेश लंके, राहुल शिंदे. **पाथर्डी** : मोनिका राजळे, कडूचंद शेटे, ऋषिकेश ढाकणे. **राहाता** : एकनाथ घोगरे, सुजय विखे पाटील, भास्करराव खर्डे. **राहुरी** : प्राजक्ता तनपुरे, हर्ष तनपुरे, भाऊसाहेब लोंढे, सत्यजित कदम. **संगमनेर** : रणजीतसिंह देशमुख, चित्रा गायकवाड. **शेवगाव** : राजश्री घुले, चंद्रशेखर घुले. **श्रीगोंदा** : राहुल जगताप, राजेंद्र नागवडे, अर्चना पानसरे, दत्तात्रय पानसरे, प्रणिती जगताप, अण्णासाहेब शेलार, बबनराव पाचपुते, प्रतापसिंह पाचपुते, सुधीर नलगे, अनुराधा जगताप, संध्या महांडुळे, प्रवीणकुमार नहाटा, साक्षी भोस. **श्रीरामपूर** : करण ससाणे, सोन्याबापू शिंदे, रणजीत बनकर, सोपानराव राऊत.

**अनुसूचित जाती-जमाती** : किरण लहामटे, तुकाराम मेंगाळ, प्रकाश सदाफुले, वैभव पिचड, विजय पाटोळे, प्रशांत लोखंडे, बाळासाहेब गंभीरे, मंगल शेलार, सुहास धीवर, प्रशांत लोखंडे, पंढरीनाथ इल्हे, अनिल भांगरे, वसंत कांबळे, सुधाकर भांगरे, रावजी मधे, विकास गायकवाड, अजिंक्य बोरूडे. **इतर मागास प्रवर्ग** : प्रशांत गायकवाड, आजिनाथ हजारे, अण्णासाहेब शेलार, शरद चौधरी, करण ससाणे, नितीन खेतमाळीस, अंकुश शेळके, कडूचंद शेटे, केशव बेरड, शंकर साठे, शिवाजी मते, अर्चना पानसरे, अश्विनी देशमुख, अनिल शिरसाठ, सुखदेव बागल, अकुंश शेळके, दादासाहेब सोनमाळी, कारभारी जावळे, कर्डिले रोहिदास, जालिंदर वाकचौरे, दिलीप रासकर, शिवदास गुंजाळ, प्रवीण लोखंडे, परीक्षित भोर, नितीन बेलेकर, विठ्ठलराव लंघे, बाळासाहेब देशमुख, अर्जुनराव बोरुडे, भानुदास मुरकुटे, रणजीत बनकर नीरज मुरकुटे, शितल म्हस्के, बाळासाहेब नाईकवाडी, किरण पाटील, मंजुषा गुंड योगिता ताठे, सत्यजित कदम, रघुनाथ मांडगे.

**शेतीपूरक संस्था** : राजेंद्र नागवडे, गंगाराम धुमाळ, रामदास आंब्रे, प्रकाश नाईकवाडी, सदाशिव पोखरकर, आशुतोष काळे, रावसाहेब वाकचौरे, अंकुश शेळके, विक्रम देशमुख, गंगाराम धुमाळ, भानुदास डोंगरे, त्र्यंबकराव सरोदे, देविदास देशमुख, राजेंद्र जाधव, दत्ता पानसरे, रामदास आंब्रे, दादासाहेब सोनमाळी, रोहिदास कर्डिले, संदीप शेनकर, अंकुश शेळके, विनोद बेलेकर, मधुकर नवले, जयश्री गिरवले, बाळासाहेब देशमुख, शंकर वाळे, वैभव पिचड, जनार्दन जगताप, रत्नमाला लंघे, सुधीर म्हस्के, शकुंतला चौधरी, दादासाहेब चितळकर, हर्षदा काकडे, रघुनाथ मांडगे. **बिगर शेती मतदारसंघ** : धनलक्ष्मी हजारे, प्रशांत गायकवाड, संजयकुमार कर्नावट, राजेंद्र नागवडे, बाळासाहेब नाईकवाडी, परिघा आरोटे, अविनाश कानवडे, संजय भळगट, नंदकुमार औताडे, वसंत लोढा, सचिन देसरडा, जनार्दन पठारे, अशोक थोरे, अमोल गर्जे, शंकर साठे, शरदराव थोरात, प्रियंका देशमुख, भाऊपाटील नवले, हाशमभाई पटेल, सुभाष गीते, दत्ता पानसरे, सचिन जगताप, रावसाहेब रोहकले, तुकाराम गुंजाळ, धनंजय गाडेकर, दिलीप रासकर, प्रणोती जगताप, रामनाथ गोल्हार, शामराव वागस्कर, प्रवीण लोखंडे, प्रतापसिंह पाचपुते, मधुकर नवले, प्रतिभा पाचपुते, बादशाह गुंजाळ, शरद झोडगे, राजेंद्र बरबडे, बापूसाहेब नेटके, वैभव पिचड, बाळासाहेब नाईकवाडी, बाळासाहेब तरटे, दीपक कुर्हाडे, पठाण अब्दुलमजीद. **महिला राखीव** : मंजुषा गुंड, चंदा गर्जे, अनुराधा नागवडे, सुवर्णा लहामगे, संजीवनी शिंदे, सोनल गायकवाड, जयमाला सोलेपाटील, रेखा नवले, शैलजा लोटके, संगीता वाघ, अश्विनी देशमुख, शारदा वाकचौरे, विद्या काळे, रूपाली लुणीया, ज्योती गोलेकर, शारदा खुळे, मनीषा राळेभात, सुप्रिया पाटील, प्रियंका देशमुख, अर्चना पानसरे, लिना ढोकणे, मीनाक्षी साळुंखे, पुष्पा गायकवाड, रत्नमाला उगले, भाग्यश्री राक्षे, शैलजा धुमाळ, सविता वैद्य, सुवर्ण कर्डिले, वैशाली देवडे, मंगल शेलार, रेखा नवले, चंद्रकला गंगावणे, प्रतिभा पाचपुते, संगीता वाघ, जयश्री गिरवली, सुनीता भांगरे, शितल म्हस्के, मनीषा बनकर, चंदा गर्जे, योगिता पाटील, गीतांजली शेळके, मृणाली शेलार, सुवर्णा पाचपुते, शकुंतला चौधरी, संध्या महांडुळे, योगिता ताठे, विजयालक्ष्मी फाळके.

**विमुक्त जाती भटक्या जमाती** : सुनिता नगरे, अशोक महारनवर, ऋषिकेश ढाकणे, अशोक थोरे, शामराव मुर्तडक, राजेंद्र कोळपे, सुखदेव तिखोने, लक्ष्मण बोठे, सुभाष गीते, सुवर्णा लहानगे, अमोल गर्जे, तुकाराम गुंजाळ, पोपट शेंडगे, ऋषिकेश ढाकणे, गणपतराव सांगळे, अरुण मुंडे, रामनाथ गोल्हार, बाबासाहेब गर्जे, राजू जोखर, अशोक महारनवर, सोपानराव राऊत, भगवान गंगावणे, दीपक कुर्हाडे आणि दादासाहेब चितळकर यांनी अर्ज दाखल केले आहेत.

### निवडणुकीतून विधानपरिषद सभापती राम शिंदे यांची माघार

गेल्या महिनाभरापासून सहकार क्षेत्रातील अनेक मातब्बर नेत्यांच्या भेटीगाठी घेत सभापती राम शिंदे यांनी निवडणुकीसाठी वातावरण निर्मिती केली होती. त्यामुळे जिल्ह्यातील प्रस्थापित राजकीय समीकरणांना आव्हान देण्यासाठी शिंदे मैदानात उतरणार, अशी चर्चा रंगली होती. मात्र शिंदे यांनीच उमेदवारी न करण्याचा निर्णय घेतल्याने राजकिय वर्तुळात खळबळ उडाली. उमेदवारी न दाखल करण्याचा निर्णय कोणत्याही दबावामुळे अथवा व्यक्तिगत कारणामुळे घेतलेला नसल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. विधान परिषदेच्या सभापती पदाचा मान-सन्मान आणि प्रतिष्ठा राखण्यासाठी आपण अंतरात्म्याचा आवाज ऐकून निवडणुकीपासून बाजूला होण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

वीरभूमी **फोडणी**

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### दुष्काळ

कल्पना नाही केली
असा येत आहे काळ
माणसाच्या कर्माचे फळ
घेऊन येतोय दुष्काळ
रस्ते करा, विकास करा
करा डोंगर सगळे साफ
झाडे कोण लावणार
आपला बाप?

## SPOT NEWS

### सेवा शुल्काच्या नावाखाली 'लालपरी'चा प्रवास महागला

**● मुंबई –** महाराष्ट्रातील २६५ तालुक्यांमध्ये शासनाने दुष्काळ जाहीर केला आहे. या दुष्काळाने शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला वर्ग आर्थिक संकटात आहे. अशा भीषण दुष्काळात ग्रामीण जनतेला स्वस्त प्रवासासाठी 'लालपरी' हे एकमेव वाहतुकीचे साधन आहे. मात्र, राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एसटीत सवलतीच्या तिकिटांसाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य केले आहे. या कार्डसाठी मागणी वाढल्याने कार्ड देणा-या ३ हजारहून अधिक असलेल्या एजंट कडून लाभार्थी प्रवाशांची सेवा शुल्काच्या नावाखाली अक्षरश: लूट सुरू आहे. त्यामुळे आधीच दुष्काळाने होरपलेल्या गावखेड्यातील ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना सवलतीच्या एसटी तिकिटासाठी लाभार्थी असतानाही स्वत:ची पदरमोड करून अधिकचे २०० ते ३०० रुपये खर्च करत हे एनसीएमसी कार्ड मिळवण्याची वेळ आली आहे. मात्र, परिवहन विभागाकडून अद्याप अशा एजंट आणि कार्ड विक्रेत्यांची तपासणी सुरू केल्याचे दिसत नाही.

### हरमनप्रीत कौरने सोडले कर्णधारपद!

**● नवी दिल्ली –** भारतीय महिला संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेत हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली सुवर्णपदक जिंकले आणि त्यानंतर मायदेशात परतलेल्या संघात बरीच खलबत झालेली पाहायला मिळाली. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने हरमनप्रीत कौर, मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार व उप कर्णधार स्मृती मानधना यांच्यासोबत संघाच्या कामगिरीचा आढावा घेणारी बैठक घेतली. त्यात हरमनप्रीतच्या कर्णधारपदाला धोका नसल्याचे म्हटले गेले, परंतु तिने इंस्टाग्रामवरून एकच खळबळ उडवून दिले. तिने भारतीय संघाचे कर्णधारपद सोडल्याचे जाहीर केले.

## ज्ञानेश कुमार निलंबन प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश देण्यास नकार

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**

सर्वोच्च न्यायालयाने आज (दि. ५ ऑक्टोबर) मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना निलंबित करणाऱ्या याचिकेवर अंतरिम आदेश देण्यास नकार दिला. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी निवडणूक आयोगाला तसेच मुख्य निवडणूक आयुक्तांसोबत इतर दोन निवडणूक आयुक्तांना नोटिस पाठवली आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील बेंचने या प्रकरणी सुनावणी करताना मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयोगावर झालेल्या आरोपांवर स्पष्टीकरण मागितले आहे. न्यायालयाने आम्ही आधी निवडणूक आयोगाने याबाबत सर्व नियमांचे पालन झाले आहे का नाही त्याची तपासणी करणार. जर कोणता निर्णय घेताना कायद्याचे पालन झालेलं नाही असं आढळले तर तो निर्णय रद्द करता येईल.

सूर्यकांत म्हणाले की, 'आम्ही फॉर्म ६ मध्ये कोणतेही मॉडिफिकेशन करण्याची परवानगी दिली नव्हती हे आधी स्पष्ट करतो. ज्यावेळी रेकॉर्ड सादर केले जातील. त्यावेळी आम्ही त्यात मॉडिफिकेशन कोणी केले हे पाहू. तुमची याचिका घाई गडबडीत केली असल्याचे दिसत आहे.

## १६ ऑक्टोबरपासून राज्यभरात पाणीकपात : मंत्री महाजन

**● मुंबई । वीरभूमी –**

अलनिनोच्या प्रभावामुळे यंदा राज्यातील पर्जन्यमानात मोठी घट झाली असून अनेक भागांत पाण्याची उपलब्धता मर्यादित झाली आहे. आगामी काळात पाणीटंचाईची तीव्रता वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य सरकारने आतापासूनच पाण्याच्या वापरावर नियंत्रण आणण्यास सुरुवात केली असून राज्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कोणतीही टंचाई भासू नये, यासाठी पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. येत्या १६ ऑक्टोबरपासून सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये किमान १० टक्के पाणीकपात लागू करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती सोमवार दि. ५ ऑक्टोबर रोजी राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरण्याचे आवाहनही जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे. जलसंपदा, महसूल, कृषी, उद्योग आणि नगरविकास विभाग समन्वयाने काम करत असून पालकमंत्री तसेच कालवा सल्लागार समित्यांच्या माध्यमातून पाणीसाठ्याचा नियमित आढावा घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी जलसंपदा विभागाने ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंतचा धरणनिहाय आणि वापरनिहाय पाणीसाठा आराखडा तयार केला आहे. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करताना सर्वप्रथम नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यावर भर देण्यात येणार आहे.

# आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासकीय योजनांचा लाभ प्राधान्याने द्यावा

## डॉ. किरण लहामटे । सेवा संकल्प अभियान अंतर्गत राणी दुर्गावती जयंती निमित्त राजूर येथे आदिवासी महिला बचत गट मेळावा व शासकीय सेवा शिबिर संपन्न

**● शिर्डी । वीरभूमी –**

शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनाने अधिक गतिमान आणि लोकाभिमुख होण्याची गरज आहे. नागरिकांना शासकीय सेवांसाठी वारंवार शासकीय कार्यालयांमध्ये यावे लागू नये. यासाठी सर्व शासकीय योजना लाभ प्राधान्याने व लोकाभिमुख होऊन एकाच ठिकाणी उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन अकोले मतदार संघाचे आमदार डॉ. किरण लहामटे यांनी केले.

सेवा संकल्प अभियाना अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय राजूर, व राणी दुर्गावती जयंती निमित्त आदिवासी महिला बचत गट मेळावा व शासकीय सेवा शिबिर राजूर येथील अक्षय साई लॉन्स येथे आयोजित करण्यात आले होते.

यावेळी प्रकल्प अधिकारी राजूर येथील देवकन्या बोकडे श्री अकोले तहसीलदार सिद्धांत मोरे, गटविकास अधिकारी अमर माने, महिला व बालविकास अधिकारी केदार नांगरे, वनपरिक्षेत्र अधिकारी दत्तात्रय पडवळ प्रतिभा सोनवणे, कृषी अधिकारी, अतुल पवार, मनोज पैठणकर, तुषार पवार, योगेश ढोणे, दीपक कालेकर, संजय सुसलादे लेखा अधिकारी व प्रकल्प कार्यालयातील कर्मचारी वृंद उपस्थित होते. आदिवासी नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर संबंधित विभागांनी तात्काळ कार्यवाही करावी. प्रशासन व नागरिकांमधील संवाद वाढल्यास अनेक प्रश्न जागेवरच मार्गी लागू शकतात. पात्र लाभार्थी शासकीय योजनांपासून वंचित राहणार नाहीत, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन आमदार लहामटे यांनी केले.

राज्य शासनामार्फत दि. १७ सप्टेंबर ते दि. १७ ऑक्टोबर या कालावधीत सेवा संकल्प अभियान २०२६ राबविण्यात येत आहे. शासनाच्या योजनाचा प्रत्यक्ष लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावा, तसेच नागरिकांच्या अडचणींचे स्थानिक पातळीवर निराकरण व्हावे, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

आदिवासी मेळावा व शासकीय सेवा शिबिरात सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वनहक्क अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारित नियम २०१२ च्या प्रभावी अंमलबजावणी अंतर्गत ७ ई आणि १२ ई चे प्रमाणपत्र वाटप




करण्यात आले. महसूल विभागामार्फत जातीचे दाखले, उत्पन्न व रहिवासी दाखले, आधार सेवा, वनहक्क आदिवासी महिला बचत गटांच्या सबलीकरणासाठी उपलब्ध योजनांची माहिती देण्यात येऊन प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

या शिबिरात नागरिकांनी विविध समस्या व मागण्या प्रशासनासमोर मांडल्या. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नाबाबत मार्गदर्शन केले. एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवा उपलब्ध झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला. पुष्पाताई लहामटे, नीता आवारी, उमेदचे श्री. कुंदन कोरडे, प्रकल्प कार्यालयाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी केले.

## SPOT NEWS

### अहमदनगर बॉईज हायस्कूलच्या १९७३-७४ च्या दहावी बॅचचा स्नेहमेळावा

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

शालेय जीवन संपून तब्बल ५२ वर्षांचा प्रदीर्घ काळ लोटला, जीवनाच्या प्रवासात प्रत्येकाची वाट वेगळी झाली, अनेकांनी संसार थाटले, मुलांचे संसार पाहिले आणि आता अनेक जण आजोबा झाले; मात्र मैत्रीचे बंध मात्र आजही तितकेच घट्ट आहेत. मराठी मिशनच्या अहमदनगर बॉईज हायस्कूलच्या सन १९७३-७४ च्या मॅट्रिक (इयत्ता अकरावी) बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी अर्धशतकानंतरही आपला स्नेहबंध जपला आहे. या वर्गमित्रांचा स्नेहमेळावा शहरातील एका हॉटेलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या स्नेहमेळाव्यात सहभागी झालेल्या माजी विद्यार्थ्यांनी जणू पुन्हा एकदा आपला शाळेचा वर्ग भरविला. एकमेकांना भेटताच जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. शाळेतील गंमती-जमती, शिक्षकांचे मार्गदर्शन, मित्रांसोबत केलेली मस्ती, परीक्षा, खेळ, शाळेतील प्रसंग अशा असंख्य आठवणींना उजाळा देत मित्रांनी मनमुराद गप्पा मारल्या. आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक नाती दुरावत असताना, ५२ वर्षांनंतरही शालेय मित्रांचे नाते जपले जाणे ही निश्चितच कौतुकास्पद बाब असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. या स्नेहमेळाव्यास हिरालाल चेंगेडिया, अनिल औटी, बंडू बनकर, सतीश जाधव, जफर खान, रावसाहेब नेटके, सुधीर नवगिरे, अविनाश रावडे, विजय सात्राळकर, अल्ताफ शेख, शांतीलाल शिंगवी, बाळू शिंदे, रमेश थोरात, सुरेश वाघमारे, बाबा भालेराव, विनीत मकासरे, हबीब पेंटर, सॅम्युअल साळवी, शशिकांत वाघमारे, चंद्रशेखर जाधव, गंगाराम मगर आदी माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिरालाल चेंगेडिया यांनी करून ग्रुपच्या वाटचालीची माहिती दिली. सर्व विद्यार्थ्यांचा परिचय विनीत मकासरे यांनी करून दिला. जफर खान यांनी उपस्थित सर्व माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल औटी यांनी केले, तर विजय सात्राळकर यांनी आभार मानले.

### प्रयास ग्रुप व दादी-नानी ग्रुपचा ३१ वा वर्धापन दिन उत्साहात

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

महिला सक्षमीकरणासोबतच महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे, त्यांना आत्मनिर्भर बनविणे आणि सामाजिक क्षेत्रात महिलांचा सक्रिय सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने गेल्या ३१ वर्षांपासून कार्यरत असलेल्या प्रयास ग्रुप आणि दादी-नानी ग्रुपचा ३१ वा वर्धापन दिन महिला शक्तीचा जागर करीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महिलासाठी विविध बौद्धिक, मनोरंजनात्मक तसेच सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांमध्ये विजेत्या ठरलेल्या महिलांना प्रमुख पाहुण्या पार्वती (काकी) जगताप व माजी नगरसेविका सुवर्णाताई जाधव यांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. अलका मुंदडा यांनी स्थापन केलेल्या प्रयास ग्रुपच्या सामाजिक कार्याला यंदा ३१ वर्षे पूर्ण झाली आहेत. या वर्धापन दिन सोहळ्यात ग्रुपच्या कार्यात नेहमीच सक्रिय सहभाग देणाऱ्या दादी-नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, अॅड. ज्योत्स्ना कुलकर्णी, मनीषा पवार आणि लीला अग्रवाल यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच वर्षभरातील विविध उपक्रमांसाठी विशेष सहकार्य करणाऱ्या मेघना मुनोत, दीपा मालू आणि दीपा सोनी यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष सुचेता बोरकर, सचिव मीनाक्षी पाठक, संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा, खजिनदार मेघना मुनोत, सरस्वती झंवर, सोनाली थोरात, गुंजली खिलारी, सुनिता चक्रवती, सविता धामट, मीरा पाटील, संपुर्णा देशमुख, आरती भुतडा, वैशाली क्षीरसागर, प्रिया गुंदेचा, मुनोत उषा, सोनी नीलिमा पवार, प्रतिभा भिसे, आरती थोरात, सोनी पुरनाळे, संगीता दंडवाणी, सुजाता कदम, सुरेखा जंगम, अरुणा गोयल, अलका वाघ, सुनीता काळे, ड. स्वाती जाधव, वैदेही बल्लाळ, प्रिया शिंदे, उज्वला बोगावत, रेखा फिरोदिया, जयश्री पुरोहित, उषा सोनटक्के, शशिकला झरेकर, सुशीला त्रंबके, ज्योती गांधी, आशा गायकवाड, दीपा मालू, दीपा सोनी आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मोठी स्वप्ने पाहा, मेहनतीने ती साकार करा

## डॉ. मनालीताई कोल्हे । संजीवनीच्या चित्रकला स्पर्धेला १,४५१ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

● **कोपरगाव । वीरभूमी -**

विद्यार्थ्यांचे खरे मार्गदर्शक शिक्षक आणि आई-वडील असतात. त्यामुळे त्यांचे मार्गदर्शन आणि अनुभवाचे बोल विद्यार्थ्यांनी मनापासून ऐकले पाहिजेत. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती साकार करण्यासाठी मेहनत घ्यावी आणि आई-वडिलांसह शाळेचेही नाव मोठे करावे. आजचे युग कृत्रिम बुद्धिमत्ता आणि वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाचे आहे. त्यामुळे बदल स्वीकारण्याची आणि नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची क्षमता विद्यार्थ्यांनी विकसित केली पाहिजे. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी बदलांशी जुळवून घेणे महत्त्वाचे असून, यशासाठी कोणताही शॉर्टकट नसतो; मेहनतीला पर्याय नाही, असे प्रतिपादन संजीवनीच्या संचालिका डॉ. मनालीताई कोल्हे यांनी केले.




संजीवनी युनिव्हर्सिटी आणि संजीवनी वुमन एम्पॉवरमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला तब्बल १,४५१ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बक्षीस वितरणप्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ. मनालीताई कोल्हे बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर वुमन एम्पॉवरमेंट सेलच्या अध्यक्षा डॉ. सोनाली चिने, उपाध्यक्षा डॉ. अश्विनी जमदाडे, डीन डॉ. सरिता पवार, विभागप्रमुख डॉ. माधुरी जावळे, डॉ. मोहिनी गुंजाळ, प्रा. वृंदा कोऱ्हाळकर, डॉ. शाहीन पठाण आदी उपस्थित होते.

इयत्ता ७ वी ते ८ वी गटासाठी 'निसर्ग वाचवा, भविष्य वाचवा', 'माझी शाळा, माझा अभिमान', 'पाणी आहे तर जीवन आहे', 'स्वच्छ सुंदर भारत', 'विज्ञान आणि माझे भविष्य', 'प्लास्टिकमुक्त भारत' आणि 'संजीवनी' हे विषय देण्यात आले होते.

इयत्ता ९ वी ते १२ वी गटासाठी 'भारत २०४७ : माझ्या स्वप्नातील भारत', 'कृत्रिम बुद्धिमत्ता : मानवाचा मित्र की भविष्याचे आव्हान?', 'युवा शक्ती-राष्ट्राची शक्ती', 'मानवता आणि तंत्रज्ञान', 'डिजिटल युगातील विद्यार्थी', 'सायबर सुरक्षितता-सुरक्षित डिजिटल भविष्य' आणि 'संजीवनी' हे विषय होते.

स्पर्धेचा निकाल : इयत्ता ७ वी ते ८ वी गट : प्रथम - स्वरूप मांढरे (आत्मा मालिक इंग्लिश मीडियम स्कूल, कोकमठाण), द्वितीय - राजनंदिनी शिंदे (न्यू इंग्लिश स्कूल, येसगाव), तृतीय - ओजस्विनी नरोडे (विद्याप्रबोधिनी प्रायमरी स्कूल, कोपरगाव).

उत्तेजनार्थ : सौम्या वर्मा (के.बी. पी. विद्यालय, कोपरगाव), ईश्वरी हांडे (शिवशंकर विद्यामंदिर, रवंदे), विव्हान मोरे (भागचंद माणिकचंद ठोळे इंग्लिश मीडियम स्कूल, कोपरगाव), वेदांती कर्पे (जनता इंग्लिश मीडियम स्कूल, संवत्सर), अंजली गुडघे (जय हनुमान विद्यालय, रांजणगाव देशमुख).

इयत्ता ९ वी ते १२ वी गट : प्रथम - दर्शना शिंदे (श्री गुरुदत्त इंग्लिश मीडियम स्कूल, शिरसगाव), द्वितीय - अंकिता रेपाळे (गुरुवर्य तुकाराम बाबा विद्यालय, कुंभारी), तृतीय - विवेकानंद सुतार (आत्मा मालिक इंग्लिश मीडियम स्कूल, कोकमठाण) आणि तनिष्का परजणे (डॉ. सी. एम. मेहता कन्या विद्या मंदिर, कोपरगाव).

उत्तेजनार्थ : श्रेया भंडारी, प्रणव शिंगारे (श्री मयुरेश्वर इंग्लिश मीडियम स्कूल, पोहेगाव), तरण्णम पिंजारी (सोमय्या विद्यामंदिर, लक्ष्मीवाडी), स्वरा देशमुख (श्री शारदा मीडियम इंग्लिश स्कूल) आणि अलकानंद निरगुडे (कर्मवीर शंकररावजी काळे विद्यालय, करंजी).

दोन्ही गटांतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना अनुक्रमे ३ हजार, २ हजार आणि १ हजार रुपये रोख, मानपत्र व प्रमाणपत्र देण्यात आले. उत्तेजनार्थ विजेत्यांना ५०० रुपये रोख व प्रमाणपत्र देण्यात आले.

दरम्यान, नितीनदादा कोल्हे यांनी स्पर्धास्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले. संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट अमित कोल्हे आणि व्हाइस चान्सलर डॉ. ए. जी. ठाकूर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

स्पर्धेचे परीक्षण कलाशिक्षक मतीन दारूवाला आणि बाबा सूर्यवंशी यांनी केले. स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थी तसेच विजेत्यांचे यावेळी अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सीमा गोसावी यांनी केले.

### विद्यार्थ्यांना योग्य व्यासपीठाची गरज : नितीनदादा कोल्हे

■ विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक क्षमता आणि कलागुणांची कमतरता नाही; मात्र हे गुण सादर करण्यासाठी त्यांना योग्य व्यासपीठ आणि संधी मिळणे आवश्यक आहे. चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांचे दर्शन घडविण्याची संधी मिळाली. स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार मिळतो. त्यामुळे यश-अपयशाची चिंता न करता प्रत्येक स्पर्धकडे शिकण्याची आणि स्वतःला घडविण्याची संधी म्हणून पाहावे. विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्यात शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे असून, त्यांच्या कार्याचेही अभिनंदन करतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण, कला, क्रीडा आणि विविध क्षेत्रांत पुढे नेण्यासाठी संजीवनी सदैव त्यांच्या पाठीशी आहे.

### महादजी शिंदे विद्यालयाचा रुद्र होले, विजया शेलार यांना 'रयत'चा आदर्श पुरस्कार

● **श्रीगोंदा । वीरभूमी -**

रयत शिक्षण संस्थेच्या १०७ व्या वर्धापनदिनानिमित्त श्रीगोंदा येथील महादजी शिंदे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सने यंदाही पुरस्कारांची परंपरा कायम राखली. विद्यालयातील विद्यार्थी रुद्र रविंद्र होले यास मा. दादा पाटील आदर्श विद्यार्थी पुरस्कार, तर विज्ञान-गणित विषयाच्या शिक्षिका श्रीम. विजया दिलीप शेलार यांना मा. शंकरराव देवराम काळे आदर्श विज्ञान-गणित शिक्षिका पुरस्कार प्रदान करण्यात आला.





सातारा येथील समाधी परिसरात ४ ऑक्टोबर रोजी झालेल्या कार्यक्रमात रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, मॅनेजिंग कौन्सिल सदस्या खा. सुप्रिया सुळे, उपाध्यक्ष ड. भगीरथ शिंदे व सचिव किशोरराजे निंबाळकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

या यशाबद्दल मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, जनरल बॉडी सदस्य बबनराव पाचपुते, राहुल जगताप, गणेश भोस, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे, नायकवडी माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांच्यासह मान्यवरांनी पुरस्कारार्थींचे अभिनंदन केले.

प्राचार्य दिलीप भुजबळ, उपमुख्याध्यापक शहाजी एकाड, पर्यवेक्षिका सुनीता काकडे, गुरुकुल प्रमुख बापू जाधव, गुणवत्ता कक्ष प्रमुख सुधीर साबळे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले. महादजी शिंदे विद्यालयास सलग तिसऱ्या वर्षी विविध मानाचे पुरस्कार मिळाल्याने विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा मोहोर उमटली आहे.

### एकल महिलांना शासकीय योजनांची माहिती; नांदूर निंबादैत्य येथे मार्गदर्शन बैठक

● **पाथर्डी । वीरभूमी-**

साऊ एकल महिला समिती, वात्सल्य शासकीय समिती आणि ग्राम विकास प्रतिष्ठान, पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने नांदूर निंबादैत्य येथे एकल महिलांसाठी मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले. शनिवारी सकाळी महादेव मंदिर परिसरात झालेल्या या बैठकीला गावातील सुमारे ४५ ते ५० एकल महिला उपस्थित होत्या.



बैठकीच्या अध्यक्षस्थानी नांदूर निंबादैत्यचे उपसरपंच भागवत वाघ होते. यावेळी पाथर्डी येथील वात्सल्य समितीचे कार्यकर्ते दिगंबर गाडे यांनी एकल महिलांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती दिली. तसेच एकल महिलांचे सर्वेक्षण करण्यासाठी आवश्यक नमुना अर्ज आणि सर्वेक्षणाचे नमुना फॉर्म उपस्थित महिलांकडून भरून घेण्यात आले.

यावेळी १८ वर्षांखालील बालकांसाठीची बाल संगोपन योजना, संजय गांधी निराधार योजना, लाडकी बहीण योजना, आयुष्मान भारत कार्डचे फायदे तसेच बचत गटांच्या माध्यमातून मिळणाऱ्या विविध लाभांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया आणि योजनांचा उपयोग याबाबत महिलांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यात आली.

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी बचत गटांच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या विविध संधींची माहितीही देण्यात आली. पात्र महिलांपर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी अशा मार्गदर्शन बैठका उपयुक्त ठरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

बैठकीस गावातील तिन्ही अंगणवाडी सेविका व मदतनीस, बचत गट निर्मितीसाठी कार्यरत अर्चना दत्तात्रय दहिफळे, स्वाती दौंड, विकास वाघ, मच्छिंद्र काकडे, बंडू नाना खंबायत यांच्यासह ग्रामस्थ आणि एकल महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# 'हनुमान अंश'प्रमाणे 'नमो सेवा गाथा'ही रेकॉर्ड करेल

## भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचा विश्वास । 'नमो सेवा - अनसुनी कहानियाँ' पथनाट्य उपक्रमाचा महाराष्ट्रात शुभारंभ

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभरात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनप्रवासातील सेवाभाव, समर्पण, राष्ट्रभक्ती आणि सुशासनाची प्रेरणादायी गाथा जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

या अभियानाअंतर्गत 'नमो सेवा - अनसुनी कहानियाँ' या पथनाट्य उपक्रमाचा महाराष्ट्रातील शुभारंभ मुंबईतील केसी महाविद्यालय येथे भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी पथनाट्य सादर करणाऱ्या कलाकारांचा आणि संयोजकांचा सत्कार करण्यात आला.

पंतप्रधान मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील संघर्ष, सेवाभाव, राष्ट्रनिष्ठा आणि जनसेवेचा प्रवास पथनाट्याच्या माध्यमातून प्रभावी पद्धतीने जनमानसापर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. पिंपरी-चिंचवडमधील कलाकार पथनाट्याद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग महाराष्ट्राच्या विविध भागांत सादर करणार आहेत. १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात एक मोठा प्रयोग, तर प्रत्येक विधानसभा क्षेत्रात किमान १० पथनाट्य प्रयोग आयोजित करण्यात येणार आहेत. त्यामुळे राज्यभरात मोठ्या प्रमाणावर हे पथनाट्य सादर होणार असून, नवोदित कलाकारांना या माध्यमातून जनजागृती आणि सामाजिक संदेश देण्याची संधी मिळणार आहे.

आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या चरित्रातून आपल्याला सेवाभाव, सुशासन, समर्पण आणि राष्ट्रभक्तीची शिकवण मिळते. त्यांच्या जीवनातील असे प्रेरणादायी क्षण पथनाट्याच्या माध्यमातून जनमानसात रुजविण्यासाठी 'नमो सेवा गाथा' हा स्तुत्य उपक्रम आहे. 'हनुमान अंश' या नवोदित कलाकारांच्या चित्रपटाने ज्याप्रमाणे रेकॉर्ड निर्माण केले, त्याचप्रमाणे 'नमो सेवा गाथा' हे पथनाट्य देखील रेकॉर्ड करेल असा विश्वास यावेळी रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.




या शुभारंभ सोहळ्याला महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड. आशिष शेलार, विधानसभा अध्यक्ष आ. राहुल नार्वेकर, भाजपचे मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, मुंबईच्या महापौर रितू तावडे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे, आ. अमित गोरखे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# SPOT NEWS

## आदिवासी जमिनीवरील 'पिक-पाणी' नोंद रद्द करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

पारनेर तालुक्यातील पुणेवाडी येथील आदिवासी समाजाच्या शासकीय जमिनीवर इतर समाजातील व्यक्तींनी पिक-पाणी नोंद लावल्याचा आरोप करीत ही नोंद तातडीने रद्द करावी, तसेच संबंधित जमिनीची चौकशी करून मूळ लाभार्थ्यांच्या वारसांची नोंद करण्यात यावी, या मागणीसाठी सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले. संबंधित प्रशासनाला एक महिन्यापूर्वी निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याने आंदोलकांनी तीव्र संताप व्यक्त केला. प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष नामदेव चांदणे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष काशिनाथ सुलाखे पाटील, मातंग एकता आंदोलन जिल्हाकार्याध्यक्ष संतोष शेलार, सामाजिक कार्यकर्ते आदिनाथ उमाप, संजय पठारे, रामदास साळवे, राजू आल्हाट, रवी साळवे, अविनाश उमाप, निखिल मोरे, सतीश साळवे, बाबाजी साळवे, प्रमोद आरणे, शिवाजी दळवी, कडूबाबा लोंढे, भगवान नवगिरे, साधना मोरे, हिराबाई गोरखे, अशोक भोसले यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलकांनी दिलेल्या निवेदनानुसार, पुणेवाडी (ता. पारनेर) येथील खंडू बहिरू कोळी हे भटक्या-विमुक्त आदिवासी समाजातील होते. त्यांच्या उपजीविकेसाठी महाराष्ट्र शासनाकडून सन १९३० मध्ये गट क्रमांक २४९७ ही शासकीय जमीन देण्यात आली होती. त्यानंतर संबंधित कुटुंब या जमिनीवर शेती करून आपला उदरनिर्वाह करीत होते. मात्र जमीन कोरडवाहू असून शेती पूर्णपणे पावसावर अवलंबून असल्याने अनेकदा पिके नष्ट होत आणि कुटुंबासमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झाल्याने खंडू कोळी व त्यांच्या पत्नीने मोलमजुरी करण्यास सुरुवात केली. मुलांच्या शिक्षणासाठी तसेच कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी त्यांनी पुणेवाडी सोडून सातारा येथे स्थलांतर केल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. तेथेही पती-पत्नीने मोलमजुरी करून मुलांना शिक्षण दिले. खंडू कोळी यांचे ११ जानेवारी १९७० रोजी निधन झाले, तर त्यांच्या पत्नी सोनाबाई खंडू कोळी यांचे ३ डिसेंबर २००१ रोजी निधन झाले. यानंतर त्यांच्या मुलगा शिवाजी खंडू कोळी व मुलगी हौसाबाई सोनबा मोरे यांनी वडिलांच्या नावावर असलेल्या गट क्रमांक २४९७ या शासकीय जमिनीवर वारस नोंद करण्यासाठी तहसीलदार कार्यालय, पारनेर येथे संपर्क साधला. त्यावेळी या जमिनीवर इतर व्यक्तींच्या नावाने पिक-पाणी नोंद करण्यात आल्याचे त्यांच्या निदर्शनास आले, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित जमिनीवरील पिक-पाणी नोंदीची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि तलाठी यांनी संबंधित जमिनीची नोंद कोणत्या प्रक्रियेतून केली, याची चौकशी करून बेकायदेशीररीत्या झालेली नोंद तातडीने रद्द करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

## जामखेड-मोहा परिसरातील अनधिकृत कला केंद्रांवर कारवाईची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जामखेड शहर व मोहा हद्दीतील अनधिकृत कला केंद्रांवर तातडीने कारवाई करावी, या मागणीसाठी अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाचे युवा जिल्हाध्यक्ष सचिन दत्तात्रय आजबे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ५ ऑक्टोबरपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. आजबे यांनी ६ ऑगस्ट २०२६ रोजी प्रशासनाकडे निवेदन देऊन संबंधित कला केंद्रांची चौकशी करण्याची मागणी केली होती. केंद्रांवरील महिलांची एचआयव्ही तपासणी, अल्पवयीन मुलींना पैशांचे आमिष दाखवून अनैतिक व्यवसायास प्रवृत्त केल्याच्या आरोपांची तसेच अमली पदार्थांच्या व्यवसायाच्या तक्रारीची चौकशी करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली होती.

# पेसा कर्मचाऱ्यांचे १७ दिवसांचे उपोषण स्थगित

### मंत्री विखे पाटलांच्या आश्वासनानंतर निर्णय । इतर १२ जिल्ह्यांप्रमाणे अहिल्यानगरमध्ये कार्यवाही करण्याचे आश्वासन

**● अकोले । वीरभूमी –**



पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायत अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी तसेच पेसा मानधन कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी अकोले पंचायत समिती कार्यालयासमोर सुरू असलेले १७ दिवसांचे उपोषण पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिलेल्या आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले. इतर १२ जिल्ह्यांप्रमाणे अहिल्यानगर जिल्ह्यातही कार्यवाही करण्याबाबत तातडीने निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच आंदोलनकर्त्यांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

पेसा क्षेत्रात कार्यरत तसेच कार्यमुक्त करण्यात आलेल्या मानधन कर्मचाऱ्यांना त्याच पदावर आणि त्याच ठिकाणी तातडीने सेवेत सामावून घ्यावे, आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत आणि सर्व पेसा मानधन कर्मचाऱ्यांची आतापर्यंतची सेवा कायम करण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी अक्षय बांबळे, प्रविण सुकटे, नवनाथ सुकटे, प्रणिता आंबेकर, आश्विनी डगळे, मनिषा बांबेरे, विद्या गोडे यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांनी उपोषण सुरू केले होते.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजी आमदार वैभवराव पिचड, सुनीता भांगरे यांच्यासह महसूल, पोलीस आणि जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा केली. त्यांच्या मागण्या व समस्या जाणून घेतल्या.

जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी या प्रश्नासंदर्भातील प्रशासनाची भूमिका मंत्री विखे पाटील यांच्यासमोर मांडली. यावेळी इतर १२ जिल्ह्यांप्रमाणे अहिल्यानगर जिल्ह्यातही कार्यवाही करण्याबाबत धोरण असल्यास त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. संबंधित आदेशातील जाचक अटी दूर करण्याबरोबरच आंदोलनकर्त्यांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर आंदोलकांनी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

दरम्यान, पंचायत समिती कार्यालयाच्या दारासमोर तब्बल १७ दिवस आंदोलन सुरू असतानाही तहसीलदार, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी याची दखल न घेतल्याबद्दल मंत्री विखे पाटील यांनी आश्चर्य व्यक्त केले. आंदोलकांनीही ही बाब मंत्री विखे पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली.

## पिंपळे खालसा मॉडेल स्कूलमध्ये जादूच्या प्रयोगांतून वैज्ञानिक दृष्टिकोनाची शिकवण



**● शिरूर । वीरभूमी –**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मॉडेल स्कूल, पिंपळे खालसा येथे शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत 'अरुण वाळुंज टॉक्स' व्यासपीठाच्या माध्यमातून 'जादूचे प्रयोग – मनोरंजनातून शिक्षणाकडे' हा विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोलशेठ धुमाळ यांनी मनोरंजनासोबतच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी जादूचे प्रयोग हे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले.

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध जादूगार रोहित कुमार चऱ्होलीकर यांनी विविध थरारक आणि चमत्कृतीपूर्ण प्रयोग सादर करून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. कबुतराची जादू, टोपीतून वस्तू काढणे आदी प्रयोगांसोबतच जादूमागील रहस्य वैज्ञानिक दृष्टिकोनातून उलगडून दाखविण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल निर्माण होऊन त्यांना मनोरंजनातून शिक्षणाचा अनुभव मिळाला.

कार्यक्रमाचे संयोजक व चित्रपट गीतकार अरुण वाळुंज यांनी 'कट्टी बट्टी', 'राजे छत्रपती', 'चांदोबाची आई' आदी अष्टपैलू कविता व गीतांचे सादरीकरण करून विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण केला.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष अमीर धुमाळ, समिती सदस्य मनीष धुमाळ, उमेश धुमाळ, वाल्मिक धुमाळ, तुषार देशमुख, उमेश रासकर यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोपरगाव नगरपालिकेच्या थकीत पाणीपट्टीवरील दंड, विलंब शुल्क माफ होणार; नगराध्यक्ष पराग संधान यांच्या मागणीला यश

**● कोपरगाव । वीरभूमी–**



नगरपालिकेच्या प्रशासकीय काळात प्रलंबित राहिलेल्या पाणीपट्टीवरील दंड व विलंब शुल्काचा आर्थिक भार कमी होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पालिकेने अडीच कोटी रुपयांची मूळ पाणीपट्टीची थकबाकी भरावी दंड आणि विलंब शुल्क माफ करण्याची कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. त्यामुळे पालिकेवरील सुमारे आठ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार कमी होण्याची शक्यता असून, उपलब्ध होणारा निधी शहराच्या विकासकामांसाठी वापरता येणार आहे.

कोपरगाव शहरातील कृष्णाई मंगल कार्यालय येथे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली टंचाई आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत नगराध्यक्ष पराग संधान यांनी कोपरगाव नगरपालिकेच्या थकीत पाणीपट्टीचा प्रश्न मांडत दंड व विलंब शुल्कातून दिलासा देण्याची मागणी केली.

नगराध्यक्ष संधान यांनी सांगितले की, प्रशासकीय काळात पाणीपट्टीची मोठी थकबाकी प्रलंबित राहिली आहे. त्यामध्ये सुमारे अडीच कोटी रुपये मूळ पाणीपट्टी, साडेतीन कोटी रुपये दंड आणि चार कोटी रुपये विलंब शुल्क, अशी एकूण सुमारे ११ कोटी रुपयांची रक्कम झाली आहे. वाढत्या दंड व विलंब शुल्कामुळे पालिकेच्या आर्थिक स्थितीवर अतिरिक्त ताण निर्माण होत असल्याने नागरिकांच्या हिताचा विचार करून त्यातून दिलासा मिळावा, अशी मागणी त्यांनी केली.

या मागणीला आमदार विवेक कोल्हे यांनीही पाठिंबा देत थकीत रकमेवरील दंड व विलंब शुल्क माफ करण्याची भूमिका मांडली. त्यावर पालकमंत्री विखे पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, पालिकेने प्रथम अडीच कोटी रुपयांची मूळ थकबाकी भरावी. त्यावरील दंड व विलंब शुल्क माफ करण्याची कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

या निर्णयामुळे पालिकेचा मोठा आर्थिक भार कमी होऊन शहरातील विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे कोपरगावच्या विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

प्रशासकीय काळातील या आर्थिक प्रश्नावर नगराध्यक्ष पराग संधान यांच्याकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. त्यांच्या मागणीला पालकमंत्री विखे पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

जनतेच्या पैशावरील अनावश्यक आर्थिक भार कमी व्हावा आणि वाचणारा निधी शहराच्या विकासासाठी वापरता यावा, या उद्देशाने ही मागणी केली होती.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रश्न समजून घेत सकारात्मक निर्णयाचे आश्वासन दिल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार, अशी प्रतिक्रिया नगराध्यक्ष पराग संधान यांनी व्यक्त केली.

# कृषि विज्ञान केंद्र दहिगाव-ने यांना सन २०२५ मधील उत्कृष्ट कार्य करणारे कृषि विज्ञान केंद्र पुरस्कार प्राप्त

**● शेवगाव । वीरभूमी –**

तालुक्यातील दहिगांव ने येथील श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था, कृषि विज्ञान केंद्राला सन २०२५ मधील उत्कृष्ट कार्य करणारे कृषि विज्ञान केंद्र या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुणे येथे आयोजित वार्षिक विभागीय कार्यशाळेत केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. श्यामसुंदर कौशीक यांनी हा पुरस्कार स्वीकारला. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांनी डॉ श्यामसुंदर कौशिक यांचा सत्कार करुन अभिनंदन केले.



दहिगावने येथील कृषि विज्ञान केंद्राचे कामकाज अध्यक्ष माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले पाटील, माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील तसेच संस्थेचे सर्व विश्वस्त मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावी पद्धतीने सुरू आहे. भारतीय कृषि अनुसंधान परिषद अंतर्गत अटारी, झोन-८ यांच्या वतीने महाराष्ट्र, गुजरात व गोवा राज्यातील एकूण ८२ कृषि विज्ञान केंद्रांचा ९ वी वार्षिक विभागीय कार्यशाळा ता.२९ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२६ दरम्यान आय.सी.ए.आर.- अटारी, पुणे येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेदरम्यान दहिगावने येथील कृषि विज्ञान केंद्र यांना सन २०२५ मधील उत्कृष्ट कार्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. श्यामसुंदर कौशिक यांनी मोहनपूर पश्चिम बंगाल येथील बिधानचंद्र कृषि विश्वविद्यालयाचे माजी कुलगुरू डॉ. एम. एम. अधिकारी यांच्या शुभहस्ते स्वीकारला. याप्रसंगी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे माजी उपमहासंचालक (कृषि विस्तार) डॉ. पी. दास , भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे माजी उपमहासंचालक (कृषि विस्तार) डॉ. के. डी. कोकाटे, आय. सी.ए.आर.अटारी, पुणेचे संचालक डॉ. एस. के. रॉय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. जी. के. ससाणे, आय. सी.ए.आर अटारी, पुणेचे प्रधान शास्त्रज्ञ डॉ. सय्यद शाकीर अली आदी प्रमुख उपस्थित होते.

या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आ. डॉ. नरेंद्र घुले पाटील, माजी आ. चंद्रशेखर घुले पाटील तसेच डॉ. क्षितीज घुले पाटील सर्व विश्वस्त मंडळ, संस्थेचे सचिव अनिल शेवाळे, सह सचिव इंजी. रवींद्र मोटे यांनी कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख व सर्व स्टाफचे अभिनंदन केले.

## SIR विरोधावरून प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आक्रमक; ठाकरे बंधूंच्या 'गर्जना मोर्चा'वर जोरदार पलटवार

**● मुंबई । वीरभूमी –**





SIR (मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण) प्रक्रियेवरून महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापले असताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी ठाकरे बंधूंच्या 'गर्जना मोर्चा'वरून भूमिका मांडली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत SIR प्रक्रियेबाबत मांडलेल्या भूमिकेचा व्हिडिओ समाजमाध्यमावर शेअर करत चव्हाण यांनी SIRला विरोध करणाऱ्या राजकीय नेत्यांना आणि पक्षांना काही सवाल उपस्थित केले आहेत.

चव्हाण यांनी समाजमाध्यमावरील पोस्टमध्ये, देशाचे पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री कोण असावेत, हे घुसखोरांनी ठरवायचे का? तसे झाल्यास लोकशाही सुरक्षित राहील का, असा सवाल केला.

तसेच एका मतदाराला एकापेक्षा अधिक ठिकाणी मतदान करण्याची मुभा असावी का? मृत्यू पावलेल्या नागरिकांची नावे मतदार यादीत असावीत का? असे प्रश्नही त्यांनी उपस्थित केले.

SIR प्रक्रियेला विरोध करणाऱ्या नेत्यांनी आणि पक्षांनी आधी या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यानंतरच प्रक्रियेला विरोध करावा, असे आवाहन रविंद्र चव्हाण यांनी केले आहे.

दरम्यान, ४ ऑक्टोबर रोजी मुंबईत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली 'गर्जना मोर्चा' काढण्यात आला. या मोर्चातून SIR प्रक्रिया रद्द करण्यासह मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली होती. यावर प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी SIR प्रक्रियेला विरोध करणाऱ्यांनी आधी या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि नंतरच विरोध करावा, असे थेट आवाहन या वेळी केले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# आढळगावात 'ग्रामदैवत'चा झेंडा; विरोधकांचा २५-० ने सुपडा साफ!

## सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टवर विकास मंडळाचे निर्विवाद वर्चस्व । ७५ उमेदवारांच्या रणधुमाळीत मतदारांनी आरोपांना मतपेटीतून दिले उत्तर

**● श्रीगोंदा । वीरभूमी-**

आढळगावच्या ग्रामदैवत सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टच्या निवडणुकीत ग्रामदैवत विकास मंडळाने विरोधकांना अक्षरशः चारीमुंड्या चीत केले. तब्बल २५ पैकी २५ जागा खिशात घालत मंडळाने देवस्थान ट्रस्टवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. आरोप-प्रत्यारोप, सोशल मीडियावरील प्रचार आणि जातीय समीकरणांच्या चर्चेला मतदारांनी थेट मतपेटीतून उत्तर देत विकास मंडळाच्या सर्वसमावेशक पॅनेलवर शिक्कामोर्तब केले. तब्बल ७५ उमेदवार रिंगणात असल्याने झालेल्या या चुरशीच्या निवडणुकीची मतमोजणी तब्बल १४ तास रंगली; मात्र निकाल लागताच विरोधकांच्या गोटात सन्नाटा पसरला.

खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष शरद जमदाडे, नानासाहेब बोळगे, उत्तमराव राऊत, देवराव शिंदे व अमर छत्तिसे यांच्या नेतृत्वाखालील ग्रामदैवत विकास मंडळ, माजी सरपंच शिवप्रसाद उबाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल ठवाळ यांच्या नेतृत्वाखालील ग्रामदैवत सेवा मंडळ, तसेच भाजपा युवा नेते महेंद्र शिंदे यांच्या ग्रामदैवत नवक्रांती मंडळासह ७३ उमेदवार आणि दोन अपक्ष असे ७५ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात होते.

निवडणुकीच्या प्रचारात कॉर्नर सभा, आरोप-प्रत्यारोप आणि सोशल मीडियावरील प्रचारामुळे वातावरण चांगलेच तापले होते. मात्र, आरोपांना प्रत्यारोपांनी उत्तर देण्याऐवजी शरद जमदाडे व उत्तमराव राऊत यांनी सूक्ष्म नियोजनावर भर देत सर्व २५ उमेदवारांना विजयी करून दाखविले. निकालाने विरोधकांच्या प्रचारातील दाव्यांना चोख प्रत्युत्तर मिळाले.

रविवारी झालेल्या मतदानात ५ हजार ५० मतदारांपैकी ३ हजार ७६० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतमोजणीदरम्यान २२८ मतपत्रिका बाद ठरविण्यात आल्या. सुरुवातीपासूनच ग्रामदैवत विकास मंडळाच्या उमेदवारांनी आघाडी घेतली. निकाल स्पष्ट होताच विरोधी गोटात शांतता पसरली.



**विजयी उमेदवार :** दिपक दगडू काळाणे (१८१४), दत्तात्रय मारुती काळे (१८५७), देविदास विष्णू काळे (१८७७), पांडुरंग नामदेव काळे (१७४७), शेखर दत्तात्रय गव्हाणे (१८२७), हरिश्चंद्र रामभाऊ गव्हाणे (१८६६), गणेश गुलाब गाढवे (२०३९), पोपट निवृत्ती जमदाडे (१८८१), अभिमन्यू बबन ठवाळ (१७०४), हरिभाऊ लहानू डाळिंबे (१८२१), जिजाराम महादेव डोके (१७८७), संजय धोंडीबा डोके (१८५३), संपत झुंबर डोके (१८६६), पांडुरंग काशिनाथ बोळगे (१८७२), शिवाजी शंकर मेहेत्रे (१८८७), राहुल अनिल राऊत (१८६६), मच्छिंद्र बन्सी वडवकर (१८५९), विजय सुभाष वाकडे (१७१८), सतीश तुकाराम वाकडे (१७७४), गणेश अनिल शिंदे (१७६०), नवनाथ शंकर शिंदे (१७९०), बाळू किसन शिंदे (१७२७), रघुनाथ प्रकाश शिंदे (१६८६), शरद साहेबराव शिंदे (१९१४), संदीप बापू सूर्यवंशी (१९७१).

नेहमीच सकारात्मक आणि सर्वसमावेशक राजकारण करणारे जेष्ठ नेते व पत्रकार उत्तमराव राऊत विजयी उमेदवारांचे अभिनंदन करण्यासाठी मतमोजणी स्थळावर आल्यानंतर गहिवरले. त्यांच्या डोळ्यातील आश्रू पाहून अनेकांच्या डोळ्यांच्या कडा ओलाविणाऱ्या ठरल्या.

### निकालाने दिले राजकीय संकेत

■ ग्रामदैवत विकास मंडळाच्या सर्व २५ उमेदवारांना मिळालेले मताधिक्य हे विरोधकांच्या आरोपांना मतपेटीतून मिळालेले उत्तर मानले जात आहे. विशेष म्हणजे कोणतेही आरक्षण नसतानाही विकास मंडळाने सर्वसमावेशक उमेदवार देत सामाजिक सलोख्याचा संदेश दिला. सर्वाधिक मते मिळविणाऱ्या गणेश गाढवे, संदीप सूर्यवंशी आणि शरद शिंदे या नव्या चेहऱ्यांना देवस्थान ट्रस्टवर काम करण्याची संधी मिळाली आहे. आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या निकालाने आढळगावच्या राजकारणाची पुढील दिशा स्पष्ट करणारे संकेत दिले आहेत.

# ७ गावातील १० विकासकामांना एक कोटींचा निधी मंजूर : आ. आशुतोष काळे

**● कोपरगाव । वीरभूमी-**

कोपरगाव विधानसभा मतदार संघाच्या ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. त्यांच्या प्रयत्नातून जिल्हा वार्षिक योजना इतर मागास व बहुजन विकास विभागाअंतर्गत मतदार संघातील ७ गावांमधील १० विविध विकासकामांसाठी तब्बल १ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. यामुळे या गावांतील रस्ते, स्मशानभूमी व इतर मूलभूत सुविधांचा प्रश्न मार्गी लागणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.



कोपरगाव मतदार संघाच्या ग्रामीण भागातील इतर मागासवर्गीय वस्तीतील सर्वांगीण विकासाला चालना देवून नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आ.आशुतोष काळे सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नांतून करंजी बु., कान्हेगाव, कोळपेवाडी, बक्तरपूर, वारी, वेस आणि संवत्सर या सात गावांतील विकासकामांना निधी मंजूर झाला आहे.यामध्ये करंजी बु. येथे अनिल चरमळ घर ते भाऊसाहेब ढवळे घर तसेच श्री लक्ष्मीआई मंदिर कोल्हे घर ते भास्कर केरू वानले घर रस्ता; कान्हेगाव येथे स्मशानभूमीला तार कंपाउंड तसेच कान्हेगाव मंदिर ते स्मशानभूमी रस्ता; कोळपेवाडी येथे नवनाथ मोरे घर ते हौशीराम वाघडकर घर रस्ता; बक्तरपूर येथे ग्रा.मा. ०६ ते शरद गरुड घर तसेच शरद गरुड घर ते पाझर तलाव रस्ता; वारी येथे भाकरे घर ते रमाकांत टेके वस्ती रस्ता; वेस येथे नुराभाई सय्यद घर ते गोसावी भीमराज मळा तसेच प्रमोद गोसावी घर ते गाढवे वस्ती रस्ता आणि संवत्सर गावठाण येथे नेहे वस्ती ते सेंद्रे वस्ती रस्ता या विकासकामांचा समावेश आहे.

या निधीतून इतर मागासवर्गीय वस्तीत होणारे रस्ते व विकासकामांमुळे नागरिकांची होणारी गैरसोय दूर होणार आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मूलभूत सुविधांच्या प्रश्नांना आता गती मिळणार असल्याने संबंधित गावांतील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. आशुतोष काळे यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे तसेच जलसंपदा व पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहेत. शासनाच्या माध्यमातून मतदारसंघातील ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावून नागरिकांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी माझा पाठपुरावा यापुढेही सुरूच राहणार असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी सांगितले आहे.

# मोहटादेवी गडावर नवरात्रोत्सवासाठी भाविकांच्या सुविधांना सर्वोच्च प्राधान्य : देवस्थान अध्यक्ष नवनाथ जगताप

## पाहणी करत महिला भाविकांच्या निवास, भोजन व सुरक्षिततेची विशेष काळजी घेण्याचे निर्देश

**● पाथर्डी । वीरभूमी-**

शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थानचे अध्यक्ष तथा धर्मदाय उपआयुक्त नवनाथ जगताप यांनी गडावरील विविध विकासकामे आणि भाविकांसाठी करण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. नवरात्रोत्सवाच्या काळात गडावर येणाऱ्या भाविकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासनाने चोख नियोजन करून तत्परतेने काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले.



अध्यक्ष जगताप यांनी गडावरील दर्शन रांग, पालखी मार्ग, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सुरू असलेली विविध कामे तसेच प्रसादालयाची पाहणी करून व्यवस्थेचा आढावा घेतला. नवरात्रोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत हजारो महिला भाविक घटी बसण्यासाठी गडावर मुक्कामी राहतात. त्यामुळे त्यांच्या निवासाची आणि भोजनाची व्यवस्था सुरक्षित, स्वच्छ व सुव्यवस्थित ठेवण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

यावेळी देवस्थान विश्वस्त तथा गटविकास अधिकारी राजेंद्र धस, शशिकांत दहिफळे, ॲड. प्रसन्न दराडे, ॲड. विक्रम वाडेकर, ॲड. कल्याण बडे, अशोक दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, बाळू शेठ लाहोटी, ॲड. ऋतिका कराळे आदी उपस्थित होते.

देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी नवरात्रोत्सवात भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची सविस्तर माहिती अध्यक्षांना दिली. पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य पथके तसेच चोवीस तास दर्शन व्यवस्था याबाबत देवस्थान समितीने केलेल्या नियोजनाचा आराखडाही त्यांनी सादर केला.

यावेळी नवनाथ जगताप म्हणाले, मोहटादेवी गडावर नवरात्रोत्सवात येणाऱ्या प्रत्येक भाविकाला सुरक्षित आणि सुलभ दर्शन मिळावे, ही देवस्थानची प्राथमिकता आहे. विशेषतः गडावर मुक्कामी राहणाऱ्या महिला भाविकांच्या निवास व भोजन व्यवस्थेत सुरक्षितता आणि स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जावे. भाविकांच्या सुविधांसाठी प्रशासन आणि कर्मचाऱ्यांनी समन्वय ठेवून चोवीस तास तत्पर राहावे.

पाहणीदरम्यान देवस्थान समितीचे जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे, लेखापाल संदीप घुले तसेच सुरक्षा विभागातील कर्मचारी उपस्थित होते. नवरात्रोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून भाविकांच्या स्वागतासाठी मोहटादेवी गड सज्ज झाला आहे.

# शेवगावच्या वीजप्रश्नावर क्षितीज घुले पाटील यांचा आक्रमक पाठपुरावा

## आठ दिवसांत वीजपुरवठा सुरळीत करण्याची वरिष्ठ अधिकाऱ्यांची ग्वाही । १० मेगावॅट क्षमतेची नवीन रोहित्रे उपलब्ध करून देण्याची मागणी

**● शेवगाव । वीरभूमी-**

शेवगाव तालुक्यातील शेतकरी आणि नागरिकांना भेडसावत असलेल्या वीजपुरवठ्याच्या प्रश्नावर पंचायत समितीचे सभापती डॉ. क्षितीजभैय्या नरेंद्रजी घुले पाटील यांनी पुढाकार घेत महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे विविध मागण्या मांडून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली. यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी येत्या आठ दिवसांत तालुक्यातील वीजपुरवठा सुरळीत करून पूर्ण क्षमतेने वीज उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची ग्वाही दिली.

तालुक्यातील सर्व गावांना सुरळीत आणि पूर्ण क्षमतेने वीजपुरवठा मिळावा, शेतकऱ्यांना शेतीसाठी आठ तास वीजपुरवठा करण्यात यावा, तर सिंगल फेज योजनेअंतर्गत नागरिकांना २४ तास वीज उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. विशेषतः बॅकवॉटर परिसरातील शेतकऱ्यांना पूर्ण क्षमतेने वीजपुरवठा मिळावा, याकडेही अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यात आले.

शेवगाव शहरासह तालुक्यातील विविध गावांना वीजपुरवठा करणाऱ्या सर्व विद्युत उपकेंद्रांची तांत्रिक पाहणी करून त्यांची क्षमता तपासण्याची मागणी करण्यात आली. सध्या काही उपकेंद्रांवर पाच मेगावॅट क्षमतेची रोहित्रे कार्यरत असून, वाढता विद्युतभार लक्षात घेता आवश्यकतेनुसार दहा मेगावॅट क्षमतेची नवीन रोहित्रे मंजूर करून तातडीने उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी करण्यात आली.

यासंदर्भात महावितरणच्या शेवगाव उपविभागीय अभियंत्यांना निवेदन देण्यात आले. डॉ. क्षितीज घुले पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देतानाच वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. तालुक्यातील वीजपुरवठ्याच्या अडचणी, शेतकऱ्यांच्या समस्या आणि बॅकवॉटर परिसरातील परिस्थितीची सविस्तर माहिती त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली.

तालुक्यातील विद्युत उपकेंद्रांची भविष्यातील गरज लक्षात घेऊन आवश्यक क्षमतेची नवीन रोहित्रे मंजूर करण्यासाठी प्रशासकीय आणि तांत्रिक कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करावी, तसेच विद्युतभाराचे तातडीने परीक्षण करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या शेतीसाठी आवश्यक वीज तसेच नागरिकांच्या दैनंदिन गरजांसाठी सुरळीत वीजपुरवठा हा मूलभूत प्रश्न असल्याने प्रशासनाने या प्रश्नावर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन कार्यवाही करावी, अशी भूमिका डॉ. घुले पाटील यांनी मांडली.




यावेळी कैलासराव नेमाने, हनुमानजी पातकळ, मंगेशजी थोरात, अशोकराव धस, एकनाथजी कसाळ, गणेशजी खंबरे, ताहेरजी पटेल, लक्ष्मण विघ्ने, मधुकर विघ्ने, मनोहर कातकडे, संतोषजी जाधव, बाबासाहेब लांडे, प्रदीपजी काळे, संतोषजी धस, मनोज तिवारी, जाकिरभाई कुरेशी, तुषारजी लांडे, विक्रांतजी लांडे, संभाजी माळवदे, संतोषजी पावसे, संदीप मोटकर, संतोष काकडे, छत्रपती गरड, संकेत तानवडे, प्रवीण मरकड, भारत कातकडे, किशोर कर्डिले, तात्यासाहेब थोरात, शिवाजी कसाळ, अफसर शेख, मुजीर शेख, कृष्णा सातपुते, राजू दोरखे, कृष्णा मडके यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी आणि तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.